**पाहिजेत**
दैनिक अट्टल संकेतसाठी संपूर्ण महाराष्ट्रात वार्ताहर, प्रतिनिधी नेमणे आहेत.
संपर्क - ९६२३४८४४८४

दैनिक
# अट्टल संकेत
ATTAL SANKET

Email : attalsanket2023@gmail.com
RNI No. MAHMAR/2023/87816

■ दैनिक ■ छत्रपती संभाजीनगर ■ वर्ष-२ ■ अंक-३३२ ■ शुक्रवार, दि. ४ एप्रिल २०२५ ■ पाने ४ ■ किंमत २ रूपये
■ Daily ■ Chhatrapati sambhajinagar ■ Vol.2 ■ Issue -332 ■ Friday, 4 April 2025 ■ Pages-4 ■ Price- 2/-

# फटक्याची वात लावायची आणि पळून जायचं हे भाजपाचं धोरण-उद्धव ठाकरे

## उद्धव ठाकरेंचं प्रत्युत्तर देवेंद्र फडणवीस नवाज शरीफ आणि जिनांच्या विचारांवर

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**

फटाक्याची वात लावायची आणि पळून जायचं हे भाजपाचं धोरण आहे. फटाका फुटला की यायचं आणि सांगायचं वात आम्हीच लावली होती. पण वात लावल्याची जबाबदारी कोण घेणार? असा सवाल उद्धव ठाकरेंनी भाजपाला केला. तसंच वक्फ विधेयक जमिनींवर डोळा ठेवून आणण्यात आलं आहे असाही आरोप केला. यानंतर देवेंद्र फडणवीस यांनाही प्रत्युत्तर दिलं.

फटक्याची वात लावायची आणि पळून जायचं हे भाजपाचं धोरण आहे. फटाका फुटल्यावर मिरवत यायचं की आम्हीच वात लावली. पण वाट लावली त्याची जबाबदारी कोण घेणार? वाट लागल्यानंतर आपण यायचं या वृत्तीला आमचा विरोध केला आहे.

जमिनी बळकावून व्यापारी मित्रांना जे देणार आहेत त्यालाही आम्ही विरोध केला आहे असं उद्धव ठाकरे यांनी म्हटलं आहे.

**जिनांनाही लाज वाटली असेल असं मुस्लिमांचं लांगुलचालन भाजपाने केलं** – जिनांनाही लाज





वाटली असेल अशी भाषणं करण्यात आली. जिनांनी जे केलं नाही ते भाजपाचे नेते आणि त्यांचे सहकारी पक्ष यांनी करुन दाखवलं.

जर ते आम्हाला हिंदुत्व सोडलं म्हणत आहेत तर मग काल भाजपाने काय सोडलं होतं? जे तुम्ही करत होतात ते लांगुलचालनच होतं. कारण तुम्हाला समोर निवडणूक दिसते आहे. फोडा आणि राज्य करा ही भाजपाची नीती आहे. मला हे सांगा या बिलाचा हिंदुत्वाशी काय संबंध आहे?

**देवेंद्र फडणवीस वाजपेयींच्या विचारांवर चालणार की जिनांच्या?**

देवेंद्र फडणवीस जे काही आम्हाला विचारत आहेत माझा त्यांना सवाल आहे की ते अटलबिहारी वाजपेयींच्या विचारांवर चालणार आहेत की मोहम्मद अली जिना आणि नवाज शरीफ यांच्या विचारांवर चालणार आहेत? जी भाषणं लोकसभेत झाली ती जि यांना लाजवणारी होती. शिवाय बाळासाहेबांचे विचार वगैरे सांगू नका.

तुम्ही लहान असाल तेव्हा.बाळासाहेब ठाकरेंनी इस्तेमासाठी मुस्लिम बांधवांना जागा दिली होती. ती तुमच्या सरकारने बुलेट ट्रेन प्रकल्पाला दिली. त्यामुळे बाळासाहेब ठाकरेंचे विचार आम्हाला शिकवू नका. तुम्ही तेव्हा बच्चे होतात. असाही टोला उद्धव ठाकरेंनी लगावला.

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी काय म्हटलं होतं?**

वक्फ सुधारणा विधेयक संसदेत! बघू या उद्धव बाळासाहेब ठाकरे सेना, हिंदूहृदयसम्राट, वंदनीय शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा विचार राखणार की राहुल गांधी यांच्या पावलावर पाऊल ठेवून तुष्टीकरण करीत राहणार?, अशी टीका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली होती. त्यांना आज उद्धव ठाकरेंनी उत्तर दिलं.

# वक्फ विधेयक राज्यसभेतही मंजूर, विधेयकाच्या बाजूने मिळाली १२८ मते

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**

वक्फ दुरूस्ती विधेयक २०२५ लोकसभेत मंजूर झाल्यानंतर आता राज्यसभेतही मंजूर झाले आहे. विधेयकाच्या बाजूने १२८ मते मिळाली. तर ९५ सदस्यांनी याच्या विरोधात मते दिली. वक्फ कायदा बनण्यापासून आता केवळ एक पाऊल दूर आहे. आता हे विधेयक राष्ट्रपतींकडे पाठवले जाईल. त्यांच्या संम तीनंतर या विधेयकाचे कायद्यात रुपांतर होईल.

राज्यसभेत वक्फ विधेयकावर चर्चा पूर्ण झाल्यानंतर अल्पसंख्यांक कार्य मंत्री किरेन रिजीजू म्हणाले, वक्फ बोर्ड एक वैधानिक निकाय आहे आणि याला धर्मनिरपेक्ष असले पाहिजे. या विधेयकामुळे एकाही मुस्लिमाचे नुकसान होणार नाही तर कोट्यावधी म ुसलमानांना याचा फायदा होईल. याआधी हे विधेयक लोकसभेत १२ तासांच्या चर्चेनंतर मंजूर झाले होते. विधेयकाच्या बाजूने २८८ आणि विरोधात २३२ मते पडली होती.

सुधारित विधेयकानुसार वक्फ बोर्डात मुसलमानांसह चार बिगर मुसलमान सदस्य असतील. यातील दोन महिला असतील. तसेच जे किमान पाच वर्षे इस्लामचे पालन करतात त्यांनाच त्यांची मालमत्ता वक्फमध्ये हस्तांतरित करता येईल. यासोबतच त्यांनी हे देखील स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला की हे विधेयक कोणाच्याही धार्मिक श्रद्धेत हस्तक्षेप करणारे नाही तर ते केवळ वक्फ मालमत्तांच्या व्यवस्थापनासाठी आहे.

'वक्फ बोर्ड' नेमकं काय आहे ? काय काम करत ?

वक्फ हा अरबी भाषेतील 'वक्फा' शब्दापासून उत्पन्न झाला आहे. वक्फ म्हणजे इस्लाम धर्म मानणाऱ्या व्यक्तीने धार्मिक कार्यासाठी दिलेली जमीन. दिल्लीत इस्लामिक राजवटीची सुरुवात झाल्यानंतर भारतात वक्फ मालमत्तेमध्ये वाढ होत गेली. वक्फची संपत्ती मालमत्तेच्या स्वरूपात स्थावर आणि जंगम अशा दोन्ही स्वरूपाची असू शकते. मुस्लिम ांसाठी पवित्र, धार्मिक किंवा धर्मादाय ठरत असलेल्या कोणत्याही परोपकारी कारणासाठी ही संपत्ती दान केलेली असू शकते. एखाद्या मालमत्तेचा दीर्घ कालावधीसाठी धार्मिक किंवा धर्मादाय हेतूंसाठी वापर केला जात असल्यास ती वक्फ मानली जाऊ शकते. या मालमत्तेचा वापर सामान्यत: शैक्षणिक संस्था, दफनभूमी, मशिदी आणि निवारा गृहे चालवण्यासाठी केला जातो. वक्फसाठी मालमत्ता देणाऱ्या व्यक्तीला आपली मालमत्ता परत घेता येत नाही. कायद्याने त्या मालमत्तेला कायम वक्फची मालमत्ता म्हणूनच संरक्षण मिळते. वक्फसाठी दिलेल्या जमिनी आणि मालमत्तेवर नियंत्रण ठेवण्यासाठी 'वक्फ बोर्ड' तयार करण्यात आले आहे. या जमिनीचा गैरवापर आणि अवैध मार्गाने तिची विक्री थांबवण्यासाठी वक्फ बोर्डाची निर्मिती करण्यात आली. सध्या एक केंद्रीय आणि ३२ राज्य वक्फ बोर्ड अस्तित्वात आहेत.

# ट्रम्प यांचा करबॉम्ब; भारतातून आयातीवर २७ टक्के शुल्क; ६० देशांवर वाढीव व्यापारकर

**न्यूयॉर्क/वॉशिंग्टन (वृत्तसंस्था)**

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आपली धमकी खरी करत जगातील ६० देशांवर 'जशास तसे' आयातशुल्क लागू करण्याची घोषणा केली. अमेरिकी प्रमाणवेळेनुसार बुधवारी संध्याकाळी त्यांनी आदेशावर स्वाक्षरी केली. या आदेशानुसार भारतीय मालावर २७ टक्के आयातशुल्क लादण्यात येणार असून मुख्य अर्थव्यवस्थांमध्ये चीननंतर 'मित्र' भारताचाच क्रमांक लागला आहे.

महसुली तूट कमी करून देशांतर्गत उत्पादनाला चालना देण्यासाठी ही करवाढ केल्याचा दावा ट्रम्प यांनी पत्रकार परिषदेत केला. आदेशावर ट्रम्प यांनी केलेल्या एका स्वाक्षरीमुळे संपूर्ण जगाची अर्थव्यवस्था अमुलाग्र बदलण्याची शक्यता वर्तविली जात आहे. आता करवाढ लादलेल्या ६० देशांसह जगभरातील अर्थतज्ज्ञ बदलत्या स्थितीचा अंदाज घेण्याचा प्रयत्न करीत आहेत. अमेरिकी वस्तूंवर भारत मोठ्या प्रमाणात आयातशुल्क लावत असल्याचा आरोप ट्रम्प प्रशासनाने वारंवार केला. बुधवारच्या आयातशुल्क वाढीत त्याचे प्रतिबिंब दिसले. भारतावर लादलेल्या कराबाबत ट्रम्प म्हणाले, ''भारताबरोबर व्यवहार अतिशय कठीण आहेत. पंतप्रधान (मोदी) नुकतेच येऊन गेले. ते माझे खूप चांगले मित्र आहेत. मी त्यांना म्हणालो, तुम्ही माझे मित्र आहात. पण, तुम्ही आमच्याशी योग्य व्यवहार करीत नाहीत.'

हा मुक्तिदिन आहे. दीर्घ काळापासून याची प्रतीक्षा होती. २ एप्रिल २०२५ हा भविष्यात अमेरिकी उद्योगांचा पुनर्जन्मदिन म्हणून ओळखला जाईल. अमेरिकेने गतकाळातील वैभव पुन्हा मिळिवल्याचा हा दिवस असेल आणि अमेरिकेला पुन्हा श्रीमंत बनविण्यास सुरुवात केल्याचा हा दिन असेल. आपण आता आणखी श्रीमंत होणार आहोत.
**– डोनाल्ड ट्रम्प, अध्यक्ष, अमेरिका**

ट्रम्प यांच्यासाठी अमेरिका प्रथम असेल, पण मोदी यांच्यासाठी भारत प्रथम आहे. अमेरिकेने लादलेल्या जशास तशा कराच्या संभाव्य परिणामांचा आम्ही अभ्यास करीत आहोत.
**– पंकज चौधरी, केंद्रीय अर्थराज्यमंत्री**

# शिक्षिकेचा अधिकाऱ्याकडून मानसिक छळ होत असल्याची तक्रार; शिक्षक संघटनांची कारवाईची मागणी

**रत्नागिरी (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

शिक्षण विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्याकडून मानसिक छळ होत असल्याची लेखी निवेदनाने तक्रार संगमेश्वर तालुक्यातील एका शिक्षिकेने जिल्हा परिषदेकडे केली आहे. या प्रकारानंतर शिक्षक संघटनांनी या शिक्षिकेला पाठिंबा देत संबंधित अधिका-यावर कारवाईची मागणी केली आहे.

वरिष्ठ अधिकाऱ्या कडून मानसिक छळ होत असल्याची तक्रार संगमेश्वर तालुक्यातील शिक्षिकेने जिल्हा परिषद प्रशासनाला निवेदनाद्वारे तक्रार सादर केली आहे. तक्रार निवेदनात म्हटले आहे की, संबंधित वरिष्ठ अधिकारी विनाकारण मानसिक त्रास देत आहेत. शिक्षिकेची शाळा ही दुर्गम भागात असून, तिथे मोबाइलला रेंजची नसते. तरीही, अधिकाऱ्याकडून जाणीवपूर्वक माहिती मिळू नये यासाठी प्रयत्न केले जात असल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. तसेच शाळेला विविध योजनांपासून वंचित ठेवण्यासाठी ग्रामस्थांना भडकवण्याचा प्रयत्न केला जात असून, शाळा व्यवस्थापन समि तीला पत्र देण्यात आल्याचेही शिक्षिकेने म्हटले आहे.

येथील शाळेत इयत्ता १ ली ते ७ वी पर्यंतचे वर्ग असून, दोन शिक्षक मंजूर आहेत. मात्र, यापैकी एका शिक्षकाची कामगिरी काढून टाकण्यात आली आहे. यासंदर्भात शाळा व्यवस्थापन समिती आणि ग्रामस्थांनी अधिकाऱ्याची कार्यालयात भेट घेतली असता, त्यांनी आपल्या बद्दल वादग्रस्त वक्तव्य केले आहे की, ङ्गमाझं कोणत्याही शिक्षकांशी पटत नाही, मी वाद करत राहते,ङ्ख असे सांगून अधिकाऱ्याने आपली बदनामी केल्याचा आरोप शिक्षिकेने केला आहे. या प्रकारामुळे शाळेतील शिक्षण व्यवस्थेवरही परिणाम होत असल्याचे दिसून येत आहे.

दोन महिन्यांपूर्वी शिक्षण विभागातील एका विस्तार अधिकाऱ्याने शिक्षिकेबरोबर गैरवर्तन केल्याची घटना देखील घडली होती. या प्रकरणाची दखल महिला आयोगाने घेतली होती. तसेच अधिकाऱ्याला निलंबित करून त्याच्यावर विभागीय चौकशी लावण्यात आली होती. आता पुन्हा एका वरिष्ठ अधिकाऱ्याविरुद्ध तक्रार आल्याने शिक्षण विभागातील कारभार चव्हाट्यावर आला आहे.

या प्रकरणामुळे संगमेश्वर तालुक्यातील काही शिक्षक संघटना एकवटल्या आहेत. त्यांनी संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्याच्या कारभाराची चौकशी करून कठोर कारवाई करण्याची मागणी जिल्हा परिषद प्रशासनाकडे केली आहे. शिक्षक संघटनांनी या अधिकाऱ्याच्या कार्यपद्धतीवर टीका करत, शिक्षकांना मानसिक त्रास देणाऱ्या अधिकाऱ्यांवर तातडीने कारवाई व्हावी, असे पत्र प्रशासनाला दिले आहे.

# राज्यभरात अवकाळीचा तडाखा! हजारो हेक्टर पिके भुईसपाट, शेतकऱ्यांचं मोठं नुकसान

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

राज्यात नाशिक, धुळ्यासह विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्रातील काही भागांत गुरुवारी अवकाळीने तडाखा दिला. धुळे जिल्ह्यात गुरुवारी सायंकाळी विजांच्या कडकडाटासह पावसाने हजेरी लावली. यात ठिकठिकाणी शेतमालाचे प्रचंड नुकसान झाले आहे. साक्री तालुक्यात पश्चिम पट्ट्यातही पाऊस झाला. विदर्भात भंडारा, यवतमाळ, बुलढाणा जिल्ह्यांत अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली, तर मराठवाड्यात वैजापूर तालुक्यात पिकांचे नुकसान झाले. विदर्भात वीज पडून शेतकऱ्यासह तीन जणांचा मृत्यू झाला. नंदुरबारमध्ये बुधवारी झालेल्या पावसामुळे २५ घरांची पडझड झाली.

**बुलढाण्याला तडाखा** – बुलढाणा जिल्ह्यातील आठ तालुक्यांना वादळी पाऊस, गारपिटीचा तडाखा बसला. सिंदखेडराजा तालुक्यातील शेंदुर्जना येथील नेताजी सुभाषचंद्र बोस विद्यालयाचे छत उडाले. यामुळे शाळेच्या मैदानावर क्रिकेट खेळणारा एक विद्यार्थी गंभीर जखमी झाल्याचे वृत्त आहे. मनमाड परिसरातही हलक्या स्वरूपाचा पाऊस झाला. त्र्यंबकेश्वर तालुक्यातही पावसामुळे आंब्याचे मोठे नुकसान झाले.

# मणिपूरमध्ये राष्ट्रपती राजवटीचा प्रस्ताव लोकसभेत मंजूर

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**

मणिपूरमध्ये राष्ट्रपती राजवट लागू करण्याचा प्रस्ताव लोकसभेत मंजूर करण्यात आला. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी हा प्रस्ताव लोकसभेत सादर केला. विरोधकांच्या बाजूने आठ खासदारांनी या विषयावर त्यांची मते मांडली. विरोधकांच्या सर्व प्रश्नांना अमित शाह यांनी उत्तर दिले. लोकसभेत ४० मिनिटांच्या चर्चेअंती मतदान झाले. आवाजी मतदानाने मणिपूरमध्ये राष्ट्रपती राजवटीचा प्रस्ताव लोकसभेत मंजूर झाला.

लोकसभेत मणिपूर संदर्भात चर्चा सुरू होती त्यावेळी विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि वायनाडच्या खासदार प्रियांका गांधी वाड्रा हे दोन प्रमुख खासदार तसेच अनेक विरोधक अनुपस्थित होते. एरवी सरकारने मणिपूरवर चर्चा करावी अशी आग्रही मागणी करणारे अनेक खासदार चर्चेवेळी अनुपस्थित होते. लोकसभेत वक्फ विधेयकावर मतदान झाल्यानंतर लगेच मणिपूरवर चर्चा होणार असल्याचे सर्व खासदारांना आधीच सांगण्यात आले होते. हा कार्यक्रम महिती असूनही अनेक विरोधी खासदारांनी चर्चे वेळी गैरहजर राहणे पसंत केले.

मणिपूरमधील राष्ट्रपती राजवटीला काँग्रेसचा पाठिंबा आहे. पण मणिपूरमध्ये कायदा – सुव्यवस्था आणि शांतता नांदावी ही काँग्रेसची अपेक्षा आहे. यासाठी केंद्र सरकारच्या नेतृत्वात काम व्हायला हवे, जे मागील काही वर्षात झालेले नाही; असे काँग्रेस खासदार शशी थरुर म्हणाले. त्यांनीच विरोधकांच्यावतीने चर्चेला सुरुवात केली. काँग्रेसने मुख्यमंत्र्यांविरोधात अविश्वास प्रस्ताव तयार केला होता. पण मुख्यमंत्र्यांनी राजीनामा दिला. यानंतरच राज्यात राष्ट्रपती राजवट लागू झाली, असेही थरुर म्हणाले. पंतप्रधान मोदींनी एकदा मणिपूरचा दौरा करावा, अशीही मागणी त्यांनी केली.

मणिपूरमध्ये सरकारी शस्त्रागारातून साठ हजार शस्त्रे आणि सहा लाखांपेक्षा जास्त दारुगोळा लुटण्यात आला. राज्याच्या आर्थिक विकासाला धक्का बसला. राज्यात फक्त राष्ट्रपती राजवट लावून प्रश्न सुटणार नाही, केंद्र सरकारलाच ठोस पावलं उचलावी लागतील; असेही शशी थरुर म्हणाले.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी विरोधकांच्या सर्व प्रश्नांना उत्तरं दिली. मणिपूरमध्ये राष्ट्रपती राजवट लागू झाल्यापासून कायदा – सुव्यवस्था नियंत्रणात आहे. मागील दोन महिन्यांपासून वटहुकुमाच्याआधारे मणिपूरमध्ये राष्ट्रपती राजवट आहे. सुरक्षा पथकांनी राज्यात परिस्थिती नियंत्रणात ठेवली आहे. जनतेचे सुरक्षा पथकांना सहकार्य लाभले आहे; यामुळे मणिपूरमधील प्रश्न लवकरच सुटतील असा विश्वास अमित शाह यांनी व्यक्त केला.

मणिपूरमध्ये वांशिक संघर्ष सुरू आहे. या संघर्षामुळे राज्याचे प्रचंड नुकसान झाले आहे. पण जेव्हा आमची सत्ता दोन्हीकडे नव्हती तेव्हाही हा संघर्ष होता. त्यावेळी तत्कालीन केंद्रीय गृहमंत्री मणिपूरमध्ये गेले नव्हते, ही बाब नोंदवून अमित शाह यांनी केंद्र सरकारने प्रश्न सोडवण्यासाठी ठोस पावलं उचलल्याचे सांगितले. वांशिक संघर्षाशी सबंधित सर्व गटांशी चर्चा करुन तोडगा काढण्याचे प्रयत्न केंद्र सरकारने सुरू केल्याचे गृहमंत्री अमित शाह यांनी दिले.

मणिपूरचे मुख्यमंत्री बिरेन सिंह यांनी ९ फेब्रुवारी रोजी राजीनामा दिला. यानंतर मणिपूरमध्ये विधानसभा विसर्जित न करता राष्ट्रपती राजवट लागू करण्यात आली आहे. कलम ३५६ नुसार राष्ट्रपती राजवट लागू केली तर दोन महिन्यांच्या आत या निर्णयाला संसदेची मंजुरी घ्यावी लागते. या तरतुदीला लक्षात ठेवून केंद्र सरकारने गुरुवार ३ एप्रिल रोजी मध्यरात्री दोन वाजता राष्ट्रपती राजवटीचा प्रस्ताव लोकसभेत मंजूर करुन घेतला.

## भावनांना मोकळी वाट विश्वासू व्यक्तीसमोरच करावी

आपल्याला खूपदा मनमोकळे बोलायला, सुख-दुःख, टेन्शन त्रास शेअर करायला कोणी ना कोणी असावं असं वाटतं असतं. असं कोणीतरी हवं जे आपल्या भावना समजून घेईल, आपल्याला समजावून सांगेन, आपली मनस्थिती सांभाळेल असं हक्काचं माणूस कोणत्याही रूपात आपण शोधत असतो. अनेकदा आपल्याला अशी माणसं मिळतात पण! कधी मित्र, मैत्रीण, शेजारी, सहकारी यांच्या रूपाने कोणीतरी आपलं खूप जवळचं होतं, खास होतं, आपला विश्वास जिंकून घेत.

एकदा का आपली कोणाशी गट्टी जमली की मग आपण आपल्या भावनांना अगदी मोकळी वाट त्या व्यक्ती समोर करून देतो. अगदी आपल्या बालपणीपासून आपली प्रेमप्रकरण, मग लग्न, आपला जोडीदार,आपली नोकरी, व्यवसाय, आपली आर्थिक परिस्थिती, आपल्या तब्येतीच्या समस्या, आपले नातेवाईक या सर्व गोष्टी यातील चांगले-वाईट अनुभव आपले आपल्या घरातील सगळ्यांचे गुण-दोष, स्वभाव, आपल्या अडचणी, आवडी-निवडी सगळं काही समोरील व्यक्तीला पहिल्या दोन तीन भेटीमध्येच सांगून टाकतो किंवा काळानुरूप सांगत जातो.समोरील व्यक्ती मात्र आपल्याला त्याच्याबद्दल, त्याच्याशी संबंधित इतर लोकांबद्दल कितपत माहिती देते आहे, ती माहिती खरी आहे की खोटी आहे याचा आपण कधी विचार किंवा शहानिशा करत नाही. आपण कोणीतरी सांगायला, ऐकायला मिळालं आणि आपल्या दुःखावर फुंकर घालायला मिळालं यातच इतकं भारावून जातो की समोरील व्यक्तीची पारख करण्यासाठी आपण वेळ घेत नाही. समोरील व्यक्तीचा स्वभाव, व्यक्तिमत्त्व कसं आहे, तो किती विश्वासू आहे, किती गांभीर्याने तो आपल्याला मदत करणार आहे, त्याची विचार शक्तीपात्रता काय आहे हे आपण लक्षात घेत नाही. फक्त आपल्या पुरतीच माहिती सांगून आपण थांबत नाही तर आपले घरातले बाहेरचे खासगी आयुष्य सुद्धा उलगडून सविस्तर समोरच्याला सांगून टाकतो.

आता जोपर्यंत आपले अशा व्यक्तीशी स्नेहसंबंध चांगले असतात, नात्यात गोडवा असतो तोपर्यंत ती व्यक्ती आपल्याला वेळोवेळी धीर देणे, आधार देणे, आपल्याला भावनिक, मानसिक साहाय्य करणं यामध्ये खूप पुढाकार घेते. खूपदा आपल्याला आर्थिक मदत करणे, आपल्या घरच्यांशी आपण कसे वागावे हे ठरवणे, आपल्या आयुष्यातील महत्त्वाचे निर्णय घेणे इथपर्यंत हक्क आपण त्या व्यक्तीला देऊन टाकलेला असतो. आपल्या जीवनातील प्रत्येक घटना, घडामोडी, अनुभव याचा सर्व पसारा आपण अशा एका व्यक्ती पुढे मांडतो ज्याला आपण पूर्ण ओळखलेलं पण नसतं. खासकरून आपले वीकपॉइंट म्हणजेच आपल्या अथवा आपल्या घरातील जवळील लोकांच्या कमकुवत बाजू सुद्धा आपण जाहीर करून टाकलेल्या असतात. ज्यावेळी समोरच्या व्यक्तीकडे आपल्याबद्दल इतकी माहिती उपलब्ध असते त्यावेळी त्याने आपल्याला पूर्ण ओळखून घेतलेलं असतं.

अनेकदा असे होते की ज्या व्यक्तीला आपण आपल्याबद्दल आपल्या घरातल्या जवळच्या लोकांबद्दल इत्यंभुत माहिती दिलेली असते तीच आपल्या विरोधात वापरली जाते. आपल्याला समाजात बदनाम करायला, आपल्याला आपल्या माणसांपासून दूर करायला, आपला आर्थिक गैरफायदा करून घ्यायला, आपल्या इतर नातेसंबंधामध्ये तणाव निर्माण करायला ही माहिती लोकं चातुर्याने वापरतात. आपलाच चार माणसात अपमान करायला, आपली दुःखं चर्चेचा विषय करून गावभर सांगायला हीच लोकं कारणीभूत असतात. आपण त्यांच्या जवळ बोललेली गोपनीय माहिती सगळीकडे पसरवून त्यावर टीकाटिप्पणी करणे, आपलीच प्रतिष्ठा धुळीला मिळवणेकामी आपणच दिलेला डाटा वापरला जातो. वेळप्रसंगी या उपलब्ध माहितीच्या आधारे आपल्याला इमोशनल ब्लॅकमेल करून स्वतःचा स्वार्थ साधायलासुद्धा असे लोकं मागे-पुढे पाहत नाहीत. आपल्याशी तोंडावर गोड बोलून, आपली स्तुती करून, आपल्याला चढवून देऊन, आपल्या माघारी मात्र हे लोकं आपल्याला पूर्ण उघड करतात. अशा लोकांना वेळीच ओळखणे, त्यांच्यापासून सावध होणे आपल्याला जमले नाही तर आपलं पूर्ण आयुष्य उद्ध्वस्त होऊ शकतं. आपल्या घरातले आपल्यापासून कायमचे तुटू शकतात, आपल्या जवळचे हक्काची लोकं दुरावले जाऊन नको ते लोकं आपल्या आयुष्याचा ताबा घेऊ शकतात.

एकदा आपण अशा लोकांच्या पूर्ण आधीन झालो, आपल्या स्वतःच्या लोकांपासून दुरावलो की आपली अधोगती सुरू होते. आपल्या स्वभावातील सवयीतील सर्व बारकावे माहिती झाल्यामुळे आपण या भ्रमात असतो की समोरचा आपल्याला किती व्यवस्थित ओळखतोय, आपल्या परिस्थितीची त्याला किती जाण आहे, जाणीव आहे, काळजी आहे. बाहेरील व्यक्तीला माझी कदर आहे, माझ्याबद्दल आदर आहे आणि आता तीच माझी सर्वस्व आहे. आपण सातत्याने आणि सदैव हेच लक्षात ठेवलं पाहिजे की जी आपली हक्काची माणसं असतात, आपल्या कुटुंबातील, रक्ताच्या नात्यातील माणसं जी आपली कोणी ना कोणी लागत असतात त्यांच्या इतकं मौल्यवान या जगात कोणीही नसतं. घरातील माणसं रागावतील, भांडतील, चिडतील, अबोला धरतील पण त्यामुळे नातं कधीच तुटत नसतं. एकमेकांवरील हक्क, अधिकार, प्रेम, काळजी यातून त्यांना आपल्याला बोलण्याचा, सल्ला देण्याचा, वेळप्रसंगी कठोर वागण्याचा पूर्ण अधिकार असतो. घरातील माणसं कधीच गोड बोलून आपली खोड मोडत नाहीत जी बाहेरची परकी आणि मतलबी जगातील माणसं करतात. आपल्या खऱ्या जवळच्या व्यक्तींना कधीच आपलं नुकसान झालेलं, वाईट झालेलं पाहावत नसतं म्हणून ते आपल्यासाठी झटतात, आपल्याशी वाद घालतात, आपल्याला चुकीच्या कृत्यापासून थांबवतात, आपण चुकीच्या दिशेला जाऊ नये म्हणून तळमळतात.

## शक्तीशाली भूकंपाने म्यानमार-थायलंड हादरवले ;अशाप्रकारे नैसर्गिक महाप्रलय जगात कुठेही येवू शकतात;सावधान!

**दिनांक** २८ मार्च २०२५ ला म्यानमार-थायलंडचा ७.७ तीव्रतेचा भयावह भूकंप तेथील जनतेसाठी अंधकारात नेणारा ठरला व यामध्ये शेकडोच्या संख्येने जिवितहानी झाली असून लाखोंच्या संख्येने गंभीर जखमी झालेत व अनेकजन अजुनही ढीगाऱ्यामध्ये दबलेले आहेत. हे दृश्य पाहून अंगावर शहारे येतात.म्यांमार-थायलंड किंवा अन्य ठिकाणी भयावह भूकंप किंवा महाप्रलय का येतात!याचे जिवंत उदाहरण म्हणजे मानवाने निसर्गावर केलेला अन्याय व अत्याचार होय.आज मानवाने स्वतःच्या स्वार्थासाठी आकाश-पाताळ -पृथ्वी, चंद्र-सुर्य, पुर्व-पश्चिम, उत्तर-दक्षिण,ग्रह-तारे या सर्वांवर अतीक्रमन करून स्वतःसाठी सुखसुविधा निर्माण केल्या.परंतु या सुखसुविधा विनाशाकडे नेणाऱ्या आहेत आणि त्याचेच प्रायश्चित्त आज म्यानमार-थायलंड सारख्या जगातील अनेक देशांना भोगावे लागत आहेत व पुढेही मोठ्या प्रमाणात भोगावे लागण्याचे चिन्ह दिसत आहे. आज मानवाने केलेल्या प्रगतीचा दुरूपयोग होत असल्याने भूकंप, सुनामी, महाप्रलय,वनवे लागने,अती उष्णता,अती पाऊस,अती थंडी, ग्लेशियर वितळणे,ज्वालामुखीचा उद्रेक, समुद्राची पातळी वाढने, भुजलसाठा दिवसेंदिवस कमी होणे या संपूर्ण विनाशकारी उद्भवणाऱ्या घटना मानवाने स्वतःहून ओढवल्या आहे. कारण वाढत शहरीकरण,औद्योगिकीकरण व सुखसुविधा याकरीता मोठ्या प्रमाणात जगात जंगलतोड सुरूच आहे. यामुळे पृथ्वीच्या पोटात ज्या प्रमाणात पाणी साठा किंवा भुजलसाठा पाहिजे होता तो साठा अजीबात नसुन; जो आहे तोही दिवसेंदिवस कमी-कमी होत आहे.यामुळे जगात मोठ्या प्रमाणात वनव्याच्या घटना, भूकंप,ज्वालामुखीचा उद्रेक वाढतांना दिसतात. त्याचप्रमाणे ज्वालामुखीचा उद्रेक यांचेही मुख्य कारण जंगलतोड व बदलत्या हवामानामुळे होत आहे हे भयावह दृश्य आज आहे आणि पुढे चालून उग्र रूप धारण करून महाभयानक होण्याचे संकेत दिसत आहे. जग निर्माल्या संपूर्ण धर्मांच्या देवी-देवतांनी मानवाला जन्माला यासाठी घातले की या पृथ्वीतलावर एकतरी बुध्दीजीवी प्राणी असावा जेणेकरून तो



संपूर्ण मानवजातीसह, मुक्या प्राण्यांची, संपूर्ण जीवजंतू, पशुपक्षी, निसर्ग व पृथ्वी यांचे रक्षण करू शकला पाहिजे.परंतु आज मानवाने स्वतःच्या फायद्यासाठी व स्वार्थासाठी संपूर्ण सीमारेषा ओलांडून आज पृथ्वीवरील संपूर्ण प्राणीमात्रांचा जीव धोक्यात टाकला आहे व याचे जिवंत उदाहरण म्हणजे म्यानमार-थायलंडमध्ये ७.७ तीव्रतेचा आलेल्या भूकंपाने संपूर्ण अस्तव्यस्त करून हाहाकार निर्माण केला.आज जगातील अनेक देश आगीशी खेळतांना दिसतात यात अमेरिका, रशिया, युक्रेन, इजरायल, इराण, पोलंड,चीन, उत्तर कोरिया इत्यादीसह अनेक देश एकमेकांवर बंदुका तानुन बसले आहेत व मोठ्या प्रमाणात बॉम्ब वर्षाव करीत आहे यामुळे सर्वत्र आगडोंब उसळल्याचे दिसून येते आणि हे सर्व वर्चस्वाच्या लढाईसाठी आहे.याकरीता एकमेकांना मोठ्या प्रमाणात विनाशकारी युद्ध सामुग्रीची देवाणघेवाण सुध्दा करीत आहेत.यामुळे अनेक देश युध्दाच्या खाईत लोटल्याने तीथे फक्त आगीचे गोळे बरसतांना दिसतात. आज जगातील करोडो एकर भुभागांची राखरांगोळी झालेली आहे व अनेक मोठमोठी जंगले आताही जळत आहे. जगातील संपूर्ण देश आज बारूदच्या ढीगाऱ्यावर बसले आहे. एवढे नुकसान डोळ्यासमोर असुनही रशिया -युक्रेन, इजरायल-इरान,हमास सह अनेक देश एकमेकांना संपविण्याची भाषा करीत आहे व युद्ध सामुग्रीच्या शर्यतीत चढा-ओढ सुरू आहे.म्हणजेच आज जग किती विनाशाकडे जात आहे हे चित्र स्पष्ट दिसून येते. जगातील काही देश गृहयुद्धाने भरडलेले आहेत त्यामुळे तीथेही रक्ताच्या नद्या वाहतांना दिसतात.पृथ्वीचा व निसर्गांचा विनाश वेळीच रोखला गेला नाही तर धरणीमाता पृथ्वीतलावर असणाऱ्या संपूर्ण जीवसृष्टीला गीळंकृत केल्याशिवाय राहणार नाही हेही तितकेच सत्य आहे.त्यामुळे जगातील नेत्यांनो आतातरी सावधान व्हा व पृथ्वीला वाचवण्यासाठी युध्दपातळीवर प्रयत्न करा अजुनही वेळ गेलेली नाही.कारण मानवाने आपल्या सुखसुविधांसाठी संपूर्ण हद्दी पार केल्याचे दिसून येते.या पृथ्वीतलावर लाखो प्रजातीचे प्राणी, पशुपक्षी, जीवजंतू वास्तव करतात. परंतु यात बुध्दीजीवी जात एकच आहे ती म्हणजे मानव आणि एकट्या मानवाने ही विनाशलिला उभी केली आहेत.त्यामुळे जगात दिवसेंदिवस भयावह परिस्थिती निर्माण झाली आहे आणि याला मुख्य कारणीभूत फक्त बुध्दीजीव प्राणी म्हणजे मानवच आहे.जगात दिवसेंदिवस विनशलिला वाढतच आहे तरीही मानलाचा



– रमेश कृष्णराव लांजेवार
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

निसर्गावर व पृथ्वीवर होणारा अत्याचार अजुनपर्यंत थांबलेला नाही हे मानवजातीचे दुर्भाग्य म्हणावे लागेल.मानवाने आपला अतिरेक वेळीच थांबविला नाही तर म्यांमार-थायलंड पेक्षाही भयावह भुकंप किंवा महाप्रलय जगाच्या कानाकोपऱ्यात केव्हाही कधीही उद्भव शकतात यालाही नाकारता येत नाही. असे सांगितले जाते की म्यांमार -थायलंडमध्ये आलेला भूकंप हा २०० वर्षांपूर्वी आलेल्या भूकंपापेक्षाही घातक असल्याचे सांगितले जाते.भारतात गुजरात मधील भुजमध्ये २६ जानेवारी २००१ ला ७.७ तीव्रतेचा भूकंप आलेला होता.तेव्हा या भूकंपात २० हजार लोकांचा मृत्यू झाला होता व दिड लाखांपेक्षा जास्त लोक गंभीररीत्या जखमी झाले होते आणि मोठ्या प्रमाणात वित्तीय हानी सुध्दा झाली होती. वैज्ञानिकांकडुन सांगितले जाते की भूकंपचा केंद्र असलेला म्यानमार मधील मांडाले क्षेत्र संवेदनशीलमध्ये गणल्या जाते. भारतीय आणि यूरेशियन प्लेट यांच्यात टकराव झाल्याने २८ मार्चला भिषण भूकंप आला.या सर्वच घटनांना कारणीभूत आपणच आहोत.

आज युद्धजन्य परिस्थिती व बदलते हवामान यामुळे अनेक पशुपक्षी लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत.त्यामुळे संपूर्ण परिस्थिती पाहता जगातील संपूर्ण देशांनी येणाऱ्या नैसर्गिक आपदांपासुन सावध रहाण्यासाठी निसर्गाची जोपासना केली आहे.कारण म्यानमार -थायलंड आलेल्या अती तीव्रतावाल्या भुकंपाने भारतातील अरूणाचल प्रदेश,पश्चिम बंगाल येथे झटके जानवले सोबतच चीन, व्हियेतनाम,तायवान, आणि लाओस याठिकाणी सुध्दा भूकंपाचे झटके जानवले. म्हणजे नैसर्गिक आपदा केव्हा व कुठे येईल हे सांगता येत नाही.

आग व पाणी यांच्याशी खेळू नका कारण आग केव्हा भस्मसात करेल ते सांगता येत नाही व पाणी केव्हा कुठे वाहुन नेईल व डुबवेल हेही सांगता येत नाही त्यामुळे सावधान!कारण या जखमा कधीच भरून निघु शकत नाही.त्यामुळे जगातील देशांनो पृथ्वीच्या रक्षणासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करा तेव्हाच आपण येणाऱ्या नैसर्गिक महाप्रलयाला थोडा का होईना अंकुश लावु शकु.

## भारतीय पिन कोड निर्मात्याची गोष्ट

आज आपण अशा व्यक्तीची माहिती घेणार आहोत, ज्यांनी आपल्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनलेल्या पिन कोड प्रणालीची निर्मिती केली. तुम्ही कधी विचार केला आहे का, तुमच्या पत्त्यावर दिलेले सहा अंकांचे पिनकोड कोणी तयार केले असेल? आज आपण जाणून घेणार आहोत पिन कोड प्रणालीचे जनक श्रीराम भिकाजी वेलणकर यांच्याविषयीः





सध्या व्हॉट्सॲप आणि ईमेलचं जग आहे. पण, हे सगळं येण्यापूर्वीपासून भारतात पोस्ट खातं नावाची संस्था संदेशांची देवाण घेवाण करत आली आहे. अहर्निशं सेवामहे अर्थात दिवस आणि रात्र लोकांच्या सेवेसाठी अर्पण असं भारतीय पोस्ट खात्याचं ध्येयवाक्य आहे.

पण, अशी दिवसरात्र सेवा केल्यानंतरही देशांच्या विविध भागांतून येणारी पत्रं योग्य त्या माणसाला पोहोचवणं हे तसं गुंतागुंतीचं काम मात्र पोस्ट खातं चोख करतं. त्याचं मुख्य कारण म्हणजे पिन कोड. आपल्या पत्त्याचा अनिवार्य भाग असलेला पिन कोड हा एका मराठी माणसाने शोधून काढला. त्या माणसाचं नाव श्रीराम भिकाजी वेलणकर. आज १ एप्रिल ही त्यांची पुण्यतिथी.

२२ जून १९१५ रोजी श्रीराम वेलणकर यांचा जन्म झाला. अतिशय खडतर परिस्थितीत आपलं शाळा आणि कॉलेजचं शिक्षण पूर्ण करून त्यांनी १९४०मध्ये अखिल भारतीय स्पर्धा परीक्षेत यश मिळवलं आणि ते भारतीय टपाल तार खात्यात प्रथम वर्गाचे अधिकारी बनले. टपालखात्यात देशातल्या विविध प्रांतातल्या स्थानिक भाषांमुळे आलेल्या पत्रांचं सॉर्टिंग करणं ही एक स्वतंत्र डोकेदुखी होती. कारण, भाषेच्या गोंधळामुळे कधी कधी एखादं पत्र भलत्याच व्यक्तिकडे जात होतं. या अडचणींवर मात करण्यासाठी वेलणकर यांनी फक्त ६ आकड्यांवर आधारलेल्या पिन कोड प्रणालीची निर्मिती केली. पिन कोडच्या गणिती रचनेमध्ये पहिले तीन आकडे हे राज्यांच्या वाट्याला देऊन त्यानंतर त्यात जिल्हा, तालुका आणि मग गाव अशी विभागणी त्यांनी केली. त्यामुळे पत्रांचं वाटप आणखी सुलभ व्हायला मदत झाली.

गंमत म्हणजे फक्त पिन कोडची निर्मिती हे वेलणकर यांचं एकमेव कार्य नाही. ते कवी, नाटककार, दिग्दर्शक, संगीतकार, संपादक आणि वक्तेही होते. त्यांनी श्रीराम बिहाग या रागाची आणि सुधा या नवीन तालाची निर्मिती केली.

संस्कृत भाषेसाठी विविध शोधनिबंध लिहिले. त्यांच्या कार्याची दखल राज्याने आणि देशानेही घेतली. १९७५मध्ये 'शिवछत्रपतिः' नाटकासाठी उपराष्ट्रपतींनी त्यांचा गौरव केला. १९९६मध्ये आजीवन अलौकिक संस्कृत सेवेबद्दल राष्ट्रपतींच्या हस्ते राष्ट्रपतीपदक देऊन त्यांचा सन्मान केला गेला.

महाराष्ट्र शासनाचा आणि गोवा कला अकादमीचा पुरस्कारही त्यांना मिळाला. श्रीराम वेलणकर यांचं १ एप्रिल १९९९ रोजी निधन झालं. पण, त्यांच्या कार्याने त्यांना अमर केले आहे. आज आपण सहज आपल्या पत्त्यावर जो पिन कोड टाकतो, तो या थोर मराठी माणसाची देणगी आहे!

## मशरूम शेती : आर्थिक उत्पन्नाचा नवा स्त्रोत



राज्य व केंद्र शासनाच्या एकात्मिक विकास निधीमधून आठ लाखाचे अनुदान घेऊन वाळवा तालुक्यातील कामेरी येथील शेतकरी दादासो आत्माराम पाटील यांनी शिव प्रेरणा मशरूम आणि कृषी उत्पादने फर्म सुरू केली. यासाठी त्यांनी हिमाचल प्रदेशातील ICAR-DMR सोलन येथे मशरूम लागवड तंत्रज्ञानावरील राष्ट्रीय प्रशिक्षण कार्यक्रम पूर्ण केला आहे. प्रशिक्षणात मिळालेल्या ज्ञानाचा आणि माहितीचा उपयोग करून त्यांनी यशस्वी मशरूम शेती केली आणि शेतकऱ्यांसाठी मशरूम शेती आर्थिक उत्पन्नाचा नवा स्त्रोत असल्याचा मार्ग दाखवून दिला.

मशरूम शेती बाबत माहिती देताना श्री. पाटील यांनी सांगितले, शिवप्रेरणा मशरूम आणि कृषी उत्पादने फर्ममध्ये १६ तांत्रिक आणि गैरतांत्रिक मजुरांच्या सहाय्याने कंपोस्ट खत निर्मिती केली जाते. कंपोस्ट खत तयार करण्यासाठी बग्यास, कोंबडीचे खत, गव्हाचा कोंडा, जिप्सम, एरिया हे सर्व एकत्र करून ओले केले जाते. कंपोस्ट खत निर्मिती हा यातील महत्त्वाचा भाग आहे.

कंपोस्ट खत निर्मितीनंतर फेज एक मध्ये भरलेले सर्व साहित्य तीन दिवस ठेवले जाते. कंपोस्ट मिश्रण कंडिशनिंग आणि पाश्चरायझेशनसाठी सहा-सात दिवस भरले जाते.

कंपोस्ट ५६ ते ५९ डिग्री सेल्सियस तापमानात चार ते सात तासासाठी पाश्चराईजड केले जाते. पाश्चरायझेशननंतर कंपोस्ट २५ ते २८ डिग्री सेल्सिअस तापमानात थंड केले जाते. आणि स्पॉनिंग केले जाते. स्पॉनचा वापर ०.५ ते ०.७५ टक्के दराने केला जातो.

स्पॉनिंगनंतर कंपोस्ट पॉलीथीनच्या पिशव्यांमध्ये भरले जाते आणि स्पॉनरनसाठी खोल्यांमध्ये हलवले जाते. यासाठी २३ ते २५ सेल्सिअस तापमान, ८५ ते ९० टक्के आद्रता आणि C02-10000ppm पेक्षा जास्त आवश्यक आहे. स्पॉनरन पूर्ण करण्यासाठी १२ ते १४ दिवस लागतात. उ२ कमी करण्यासाठी ताजी हवा दिली जाते या टप्प्यात तापमान १६ ते १८ डिग्री सेल्सिअस आणि आद्रता ८० ते ८५ टक्के असते ताजी हवा दिल्यानंतर मशरूम काढण्यासाठी दहा ते बारा दिवस लागतात एका खोलीतून ३० दिवस मशरूम काढता येते.

दहा किलोच्या एका बॅगमध्ये ५० ते १०० ग्रॅम स्पॉन टाकल्यानंतर यातून दीड ते दोन किलो मशरूमचे उत्पादन मिळते. एका बॅच मधून सरासरी दीड टन उत्पादन मिळू शकते.

एक महिन्यात तीन बॅच मधे चार ते पाच टन उत्पादन मिळते. मुंबई, बेंगलोर यासह मोठ्या शहरात याची विक्री व्यवस्था असून उत्पादन खर्च वजा जाता १८ ते २५ टक्के नफा मिळू शकतो. मशरूम शेती कमी कालावधीत अधिक उत्पन्न मिळवून देण्याचा नवा स्त्रोत असल्याने शेतकऱ्यांनी या शेतीकडे वळावे व श्री. पाटील यांच्याप्रमाणे आर्थिक उत्पन्नाचा नवा मार्ग स्वीकारावा.

– जिल्हा माहिती कार्यालय, सांगली

# पैठण तालुक्यातील शेतरस्त्यांच्या प्रकरणांची दि.७,१५ व २१ रोजी सुनावणी

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

पैठण तालुक्यातील शेतरस्त्याच्या प्रकरणांची अंतिम सुनावणी सोमवार दि.७, मंगळवार दि.१५ व सोमवार दि.२१ रोजी दुपारी २ वाजता पैठण तहसील कार्यालयात होणार आहे,असे पैठणच्या उपविभागीय अधिकारी निलम बाफना यांनी कळिवले आहे. यासंदर्भात महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ अंतर्गत दाखल झालेल्या रस्ता प्रकरणांवर तातडीने सुनावणी घेण्याचे आदेश प्रशासनाला देण्यात आले आहेत.

मुख्यमंत्र्यांच्या १०० दिवसांच्या कार्ययोजनेंतर्गत नागरी सुविधा सुधारण्याच्या उद्देशाने हा निर्णय घेतला गेला आहे. विशेषतः, शेतकऱ्यांना शेतीकामासाठी रस्त्यांची नितांत गरज असते. त्यामुळे शेती हंगामाच्या सुरुवातीला शेतकऱ्यांसाठी रस्त्यांची सोय व्हावी, यासाठी प्रशासनाने लवकरात लवकर मार्ग काढावा, असे निर्देश देण्यात आले आहेत. जून महिन्यात शेती मशागतीच्या कामाकरीता शेतकऱ्यांना रस्त्याची आवश्यकता असल्याने दाखल रस्ता प्रकरणात जलद गतीने सुनावणी घेऊन रस्ताचे प्रकरण त्वरीत निकाली काढण्याकरीता रस्ता प्रकरणात तहसिल कार्यालय पैठण येथे दि.७, दि.१५ एप्रिल व अंतिम सुनावणी दि.२१ एप्रिल रोजी दुपारी २ वा. रोजी घेण्यात येणार आहे.

शेतकऱ्यांना रस्ते मोकळे करणे, उपलब्ध करुण देणे ही त्यांच्या जिव्हाळयाची बाब असल्यामुळे ही प्रकरणे मोहिम स्वरुपात निकाली काढण्यात येणार आहे, याची संबंधित शेतकरी तसेच संबंधित प्रकरणातील वकिलांनी नोंद घ्यावी, असे पैठणच्या उपविभागीय अधिकारी निलम बाफना यांनी कळिवले आहे.

# आपत्ती व्यवस्थापन परिचय प्रशिक्षण दि.१६ पासून

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल आणि जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या संयुक्त विद्यमाने दि.१६ ते २३ दरम्यान आपत्ती व्यवस्थापन परिचय प्रशिक्षण कार्यक्रम ) आयोजित करण्यात आला आहे,असे निवासी उपजिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण विनोद खिरोळकर यांनी कळिवले आहे.

प्रशिक्षणाचे वेळापत्रक व समन्वयकांचा संपर्क याप्रमाणे-

१. बुधवार दि.१६- सरस्वती भुवन शिक्षण संस्था, औरंगपुरा, छत्रपती संभाजीनगर,मंगेश डोलारे (मो. ९७६४७९८५२४)

२. गुरुवार दि.१७- जि. प्र. प्रशाला, गणोरी, ता. फुलंब्री,अनिल देशमुख (मो. ९२२६९६६३७६)

३. सोमवार दि.२१- जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर, दीपक उदावंत (मो. ७०५८०१०४५०)

४. मंगळवार दि.२२- तहसील कार्यालय, गंगापूर, पारस पेटारे (मो. ९५०३४९६२०४), शुभम अहिरे (मो. ९५४५३६०५०२)

५. बुधवार दि.२३- तहसील कार्यालय, फुलंब्री, सतिश शिंदे (मो. ९५२७४९५३१५), श्री. हरिदास पांढरे (मो. ८०८०२६८०४७)

त्वरित प्रतिसादासाठी प्रशिक्षण महत्त्वाचे

आपत्ती काळात सर्व संबंधित घटकांच्या त्वरीत प्रशिक्षणासाठी प्रशिक्षण महत्त्वाचे असते. प्रशासन, स्थानिक स्वराज्य संस्था, स्वयंसेवी संस्था आणि नागरिकांनी आपत्ती व्यवस्थापनात कशी भूमिका बजवावी, याबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. आपत्ती निवारण, बचाव कार्य आणि पुनर्वसन यासंदर्भात NDRF तज्ज्ञांकडून प्रात्यक्षिक आणि सखोल माहिती दिली जाईल.

### प्रशिक्षणातील घटक

प्रशिक्षणादरम्यान विविध आपत्ती परिस्थिती हाताळण्यासाठी प्रशासनाची तयारी, बचावकार्याचे तंत्र, स्थानिक नागरिकांची सहभागिता आणि तातडीच्या उपाययोजना यावर भर दिला जाणार आहे. जिल्हाधिकारी यांच्या मान्यतेने हा उपक्रम राबविण्यात येत असून, जिल्ह्यातील शासकीय तसेच खासगी संस्थांनी या प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# जिल्ह्यातील ग्रामीण भागात मनाई आदेश

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

आगामी कालावधीत विविध सण, उत्सवांच्या पार्श्वभुमिवर कायदा सुव्यवस्था अबाधित रहावी म्हणून जिल्ह्यातील ग्रामीण भागात महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७(१) व ३७ (३) अन्वये मनाई आदेश जारी करण्यात आले आहेत. अपर जिल्हादंडाधिकारी विनोद खिरोळकर यांनी हे आदेश निर्गमित केले असून दि.८ ते २२ एप्रिल पर्यंत हे आदेश अंमलात राहतील,असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

# राजकीय पुढाऱ्यांनो आपली पोळी शेकण्यासाठी इतिहासाचा गैरवापर करू नका

ही बाब सत्य आहे की औरंगजेब क्रूर होता. कारण त्यांनी आपल्या बादशाहीसाठी आपला संपूर्ण परिवार संपविला आणि छत्रपती संभाजी महाराजांची अमानुषपणे यातना देऊन हत्या केली हेही सत्य आहे.आकाश-पाताळ एक केले तरी संभाजी महाराज कोणाच्याही हाती लागणारा योध्दा नव्हता. कारण तो छावा होता.आपल्याच माणसांनी फितूरी करून संभाजी महाराजांना औरंगजेबाच्या ताब्यात दिले व मोठा घात झाला.यदाकदाचित असे जर झाले नसते तर छत्रपती संभाजी महाराजांनी संपूर्ण मोगलशाही क्षणातच संपुष्टात आणली असती हेही तितकेच सत्य आहे.परंतु फितूरीने संभाजी महाराजांचा घात झाला व औरंगजेबाने त्यांना कैद केले व अनंत यातना देऊन त्यांची हत्या केली.याचे दुःख आजही महाराष्ट्रासह संपूर्ण भारतवासीयांना होते व आहे.त्याचप्रमाणे आजही या घटनेने संपूर्ण जनतेचा खुन खवळतो.परंतु राजकीय पुढाऱ्यांचा नाही कारण ते स्वार्थापोटी वेगवेगळे नवीन-नवीन मुद्दे निर्माण करून धर्मा-धर्मामध्ये व्देष पसरविण्याचे काम करतात हा त्यांचा धंदा होऊन बसला आहे. भारतात इंग्रजांनी १५० वर्षे राज्य केले.या दिडशे वर्षांत इंग्रजांनी लाखोंच्या संख्येने निरअपराधांचा बळी घेतला.गुन्हा नसतांनाही अनेकांना मृत्यूच्या खाईत लोटले.अशा भयावह परिस्थितीला सुध्दा राजकीय पुढाऱ्यांनी विसरून चालणार नाही हेही लक्षात ठेवले पाहिजे. १३ एप्रिल १९१९ रोजी अनेक कुटुंबे जालियनवाला बागेत शांतता निषेधासाठी जमली होती. मात्र ब्रिटिश सैन्याच्या नेतृत्वाखालील जनरल डायरने आपल्या सैनिकांना गोळीबार करण्याचा आदेश दिला आणि पूर्ण दारूगोळा संपेपर्यंत हा नरसंहार सुरूच राहिला.या घटनेत १५०० हून अधिक लोक मृत्युमुखी पडले,तर १२०० हून अधिक लोक गंभीर जखमी झाले होते.या घटनेने देशात सर्वत्र शोककळा पसरली व अंधक्कार निर्माण झाला.मग आपण आता इंग्रजांनी बांधलेल्या इमारती किंवा स्मारके तोडणार का? असाही प्रश्न उपस्थित होतो! त्यामुळे इतिहास घडला तो घडला त्यांच्याशी छेडछाड किंवा गैरवापर करून काहीतरी विवादास्पद वक्तव्य देवून आपसात झगडे लावण्याला काहीही अर्थ नाही असे मला वाटते.औरंगजेबाने भारतावर ४९ वर्षे (१६५८-१७०७)राज्य केले.याच्या तुलनेत इंग्रजांनी १५० वर्षे राज्य केले.क्रूरता दोघांमध्येही होती या दोघांनी आपल्या संपूर्ण हद्दी पार करून भारतावर राज्य केले.त्यामुळे हा इतिहास आहे याला जर राजकीय पुढारी आपापल्या पद्धतीने हाताळीत असेल तर देशात व्दिधा निर्माण होवून आपसात किंवा धर्मा-धर्मात वैरत्व वाढु शकते.त्यामुळे कोणत्याही इतिहासाबद्दल बोलायचे असेल तर जाणीवपूर्वक व अभ्यास करूनच बोलले पाहिजे.देशात ज्याही काही ऐतिहासिक वास्तू आहेत त्याला सांभाळण्याचे दायित्व इतिहासकार व भारतीय पुरातत्व विभाग(ए. एस.आय.) यांच्याकडे आहे करीता यात कोणतीही राजकीय ढवळाढवळ किंवा वक्तव्येबाजी नको. येणाऱ्या पिढीला पुर्वी काय घडले याचाही इतिहास माहीत असायला हवा.

आपण औरंगजेबाची कबर जर हटविली तर कोणाला माहीत होणार की तो क्रूर शासक होता किंवा मराठ्यांनी त्याला इथेच संपविले. नवीन पिढीला देशाचाच नाही तर संपूर्ण जगाचा इतिहास माहीत व्हायला पाहिजे.त्यामुळे कबर हटवुन इतिहासाशी छेडछाड करता येणार नाही. सध्या ब्रिटिशमध्ये संसदीय अधिवेशन सुरू आहे यावेळेस संसदेत जालियनवाला बाग हत्याकांडाचे पडसाद उमटतांना दिसले. ब्रिटिश संसदेत तेथीलच खासदार बॉब ब्लॅकमॅन यांनी जालियनवाला बाग हत्याकांडासाठी ब्रिटनने भारताची औपचारिक माफी मागावी अशी मागणी केली.या मागणीवरून ब्रिटनच्या संसदेत मोठा गदारोळ झाला.दिनांक १३ एप्रिल १९१९ मध्ये पंजाबमधील जालियनवाला बाग येथे हे भयावह हत्याकांड घडले होते.बॉब ब्लॅकमॅन यांनी या घटनेचा उल्लेख ब्रिटिशांच्या वसाहत काळाच्या इतिहासातील लाजिरवाणा काळा डाग असे संबोधित केले आहे.या हत्याकांडाच्या पार्श्वभूमीवर ब्रिटिश सरकारने या अमानवीय कृत्याची जबाबदारी स्वीकारून औपचारिक माफी मागण्याचे आव्हान ब्लॅकमॅन यांनी संसदेत केले याचे स्वागतच. परंतु आता भारत सरकार या हत्याकांडाबदल माफी मागण्यास ब्रिटिश सरकारवर दबाव टाकणार काय असा प्रश्न उपस्थित होतो. त्यामुळे हे लक्षात ठेवले पाहिजे की ज्या प्रमाणे औरंगजेब क्रूर होता त्याच्या पेक्षा जास्त इंग्रजही क्रूर होते ही बाब जालियनवाला बाग हत्याकांडावरून सर्वांना लक्षात येते. त्यामुळे सध्या देशात जातीधर्माचे जे काही राजकारण सुरू आहे ते फक्त राजकीय पोळी शेकण्यासाठी इतिहासाचा गैर वापर करीत असल्याचे स्पष्ट दिसून येते.देशात अनेक मोठमोठ्या समस्या आहेत बेरोजगारी,पाण्याची समस्या, कुपोषण, शैक्षणिक समस्या, महागाई, प्रदुषण, नैसर्गिक महाप्रलय,शेतकऱ्यांच्या समस्या इत्यादी अनेक महत्त्वपूर्ण समस्या आहेत.परंतु त्याबाबतीत लोकांची दिशाभूल (डायव्हरशन) करण्याच्या उद्देशाने राजकीय पुढारी इतिहासाचा गैर वापर करून प्रक्षोभक वक्तव्य देत असल्याचे दिसून येते. राज्यासह देशातील राजकीय पुढाऱ्यांनी महापुरुष, थोर महात्मे,महान योध्दा किंवा इतिहास यांचा पुर्ण अभ्यास करूनच वक्तव्य केले पाहिजे जेणेकरून कोणाच्याही भावना दुखावल्या जाणार नाही किंवा चुकीचा संदेश जाणार नाही याची काळजी मुख्यत्वे करून राजकीय पुढाऱ्यांनी घेतली पाहिजे.कारण एका चुकीच्या वक्तव्याने किंवा प्रक्षोभक भाषणाने लोकांमध्ये व्दिधा निर्माण होते व याचे वाईट पडसाद उमटतांना दिसतात हे आपणा सर्वांनाच ग्यात आहे.याची जाण राजकीय पुढाऱ्यांनी ठेवली पाहिजे.

जगाच्या पाठीवरील भारत असा एकमेव देश आहे की याठिकाणी सर्वच धर्माचे, जाती पंथाचे लोक एकोप्याने राहतात व विभिन्न संस्कृती या भुमित दिसून येते.त्यामुळे जगात भारताची ओळख सुद्धा आगळीवेगळी आहे.त्यामुळे जगातील अनेक लोक भारतात इतिहासाचा,संस्कृतीचा व विविधतेचा अभ्यास करण्यासाठी येतात.

त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज यांची विरगाथा जगाच्या कानाकोपऱ्यात गेली पाहिजे यासाठी सर्वांनीच प्रयत्न करायला हवेत.मी महामहीम राष्ट्रपती,प्रधानमंत्री, उपराष्ट्रपती, सुप्रीम कोर्ट व लोकसभा अध्यक्ष यांना विनंती करतो की राजकीय पुढारी इतिहासाचा गैर वापर करून प्रक्षोभक किंवा लोकांचे मन दुखावणारे वक्तव्य करीत असेल व समाजात जहर पसरविण्याचे काम करीत असेल अशांवर कठोर कारवाई करावी. जय हिंद!

**-रमेश कृष्णराव लांजेवार**
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

# गिग, प्लॅटफॉर्म कामगारांनी इ-श्रम पोर्टलवर नोंदणी करण्याचे आवाहन

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

गिग वर्कर, प्लॅटफफॉर्म वर्कर व ॲग्रिगेटर यांनी इ-श्रम पोर्टलवर नोंदणी करावी,असे आवाहन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी केले आहे.

केंद्र शासनाने यासंदर्भात नोंदणी करण्यास सुरुवात केली आहे. अशी नोंदणी केल्यास या कामगारांची माहिती केंद्र सरकारकडे तयार होईल. त्यासाठी सर्व गिग व प्लॅटफफॉर्म कामगारांनी आपली नोंदणी करावी. तसेच डिजीटल मध्यस्थी म्हणुन काम करणाऱ्या सर्व सेवा पुरवठादार यांनी ॲग्रिगेटर म्हणून नोंदणी करावी. नोंदणीसाठी register. eshram.gov.in/#/user/ latform-worker-registration या लिंकवर जावे, असे आवाहन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी व कामगार उपायुक्त सी.ए. राऊत यांनी केले आहे.

**गिग व प्लॅटफॉर्म कामगार व ॲग्रिगेटर म्हणजे काय? -** गिग व प्लॅटफॉर्म वर्कर म्हणजे शेअरिंग वाहन कामगार, अन्न व किराणा पुरवठा कामगार, लॉजिस्टीक सेवा देणारे कामगार, मिडीया सर्व्हिसेस इ.सर्व प्लॅटफॉर्म , गिगा वर्कर या व्याख्येत येतात. आणि ॲग्रिगेटर म्हणजे ॲमेझॉन, फ्लिपकार्ट, मिंत्रा, स्नॅप्डील, अजिओ, मिशो, स्विगी, झोमॅटो असे वेगवेगळे सेवा पुरवठादार वा डिजीटल मध्यस्थ हे होय. अशा वेगवेगळ्या ऑनलाईन प्लॅटफफॉर्मवर काम करणारे कामगार हे इ-श्रम या पोर्टलवर eshram.gov.in नोंदणी करु शकतात.

# नाशिकला पुन्हा झोडपले

नाशिक : जिल्ह्यातील अनेक भागांत अवकाळी पावसाने गुरुवारी सलग दुसऱ्या दिवशी हजेरी लावली. चांदवड तालुक्यात गारपिटीने तडाखा दिला, तर निफाड तालुक्यातही जोरदार पाऊस झाला. देवळा तालुक्यात पावसामुळे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

# अखिल भारतीय बळीराजा संघटनेची बैठक संपन्न; विविध पदाधिकाऱ्यांची नियुक्ती जाहिर

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**



दि. ३० मार्च रोजी सुभेदारी विश्राम गृह येथे आयोजित करण्यात आली. या बैठकीत संस्थापक अध्यक्ष निवृत्ती डक पाटील, प्रदेश अध्यक्ष शिवाजीराव साळुंके पाटील आणि प्रदेश सचिव जी. के. गाडेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत विविध पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली.

बैठकीत मराठवाडा विभागाचे अध्यक्ष म्हणून प्रभाकर भुसारे, जिल्हा सरचिटणीस म्हणून ज्ञानेश्वर काकडे आणि जिल्हा उपाध्यक्ष म्हणून ज्ञानेश्वर तांबे यांची नियुक्ती करण्यात आली. तसेच म राठवाडा संघटक म्हणून लक्ष्मण टेळे यांना, वाळूज महानगर प्रमुख म्हणून चंद्रहास मते यांना तर अल्पसंख्यांक जिल्हा अध्यक्ष म्हणून मोईनोदीन शाह यांना नियुक्ती देण्यात आली.

याशिवाय बाबासाहेब डगळे यांना ता संघटक वैजापूर म्हणून, गंगाधर कुंभार यांना सलागर रवी थोरात यांना जिल्हा संघटक म्हणून, तसेच तुकाराम राऊत यांना शहर सचिव म्हणून नियुक्त करण्यात आले. वाळूज महानगर सचिव म्हणून योगेश चंद्रहास यांची नियुक्ती करण्यात आली.

यावेळी विविध अन्य पदाधिकारी देखील उपस्थित होते, ज्यांना संघटनात्मक दृष्टीकोनातून जबाबदारी दिली गेली. बैठकेदरम्यान, सर्व पदाधिकाऱ्यांनी एकजूट आणि संघटनात्मक कार्याची महत्त्वता सांगितली आणि आगामी काळात संघटन मजबूत करण्याची प्रतिज्ञा केली.

संस्थापक अध्यक्ष निवृत्ती डक पाटील यांनी या सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना त्यांच्या कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आणि संघटनेच्या उद्दिष्टांची पूर्तता करण्यास प्रोत्साहन दिले.

# बाजार सावंगी येथे व परिसरात गारमिश्रीत पाऊस,सर्वत्र पाणीच पाणी



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

खुलताबाद/प्रतिनिधी दि.०३ खुलताबाद तालुक्यातील बाजार सावंगी येथे व परिसरात अवकाळी गार मिश्रीत पावसाने तारांबळ उडवून दिली. गुरुवारी दि.३ दुपारी तीन साडे तीन च्या दरम्यान अचानक पावसाला सुरूवात झाली तर काही वेळाने हरभऱ्या प्रमाणे गारा मिश्रीत पावसाला सुरुवात झाली.ना ना म्हणता संध्याकाळपर्यंत पावसाची रिपरिप सुरूच होती. तर दाट ढगाळ वातावरण पावसाची शक्यता बनुन होती.गत तीन चार दिवसा पासून दाट ढगाळ वातावरण अच्छदान टाकूनच होता. तसं वादळ वारा गारपीट सह पावसाचे अंदाज अगोदरच वर्तविण्यात आले होते.

झालेल्या अवकाळी पावसाने गारपीट ने शेतकऱ्यांची मोठी धावपळ झाली तारांबळ उडाली व गहु मका ज्वारी कांदा बीज वाई विट भट्टी मका भाजी पालाचे नुकसान झाले आहे. ठिकठिकाणी सखोल खोलगट भागात पाणी साचले रस्त्यावर खड्ड्यात पाणी भरले.


गत १०-१५ दिवसा पासून कडक ऊन उकडा तापमान वाढल्याचे चित्र होती परंतु झालेल्या अवकाळी पावसाने थंडावा गारवा निर्माण झाला असुण उकडा तापमान गायब झाला. वारा नसताना मात्र विज महा वितरण कंपनीच्या विद्युत खंडित झाले होते. अद्याप ही दाट ढगाळ वातावरण असुण पावसाची शक्यता बनुन आहे..खुलताबाद तालुक्यातील सुलीभंजन.कागजीपुरा परिसरात असलेल्या शेकडो विट भट्टी चालकांची देखील धावपळ उडाल्याचे पाहायला मिळाले. पावसामुळे विटांची मोठी हानी होण्याची शक्यता असल्याने विटभट्टी व्यावसायिक तातडीने उपाययोजना करण्यासाठी धावपळ करताना दिसले.

# भगवान महावीर जन्म कल्याण महोत्सवानिमित्त जैन टॅग तर्फे गो दान महा दान या कार्यक्रमाचे आयोजन

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

सकल जैन समाज भगवान महावीर जन्म कल्याण महोत्सव समिती व जैन टॅग तर्फे गो दान महा दान या कार्यक्रमाचे आयोजन दिनांक ०४ एप्रिल रोजी सकाळी ९ वाजता चंद्रसागर धर्म शाळा शाहागंज येथे आयोजन करण्यात आले आहे.

अहिसं परमो धर्म व जिओ और जिने दो भगवान महाविरांचा संदेश लक्षात ठेवुन या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये ५१ गाईसाठी आहार, औषध, व चारेची व्यवस्था करण्यात येणार आहे.



तरी कार्यक्रमासाठी सकल जैन समाज बांधवानी उपस्थित राहावे. असे आव्हाण अध्यक्ष श्वेता कासलीवाल, उपाध्याक्ष पुर्वा कासलीवाल, सचिव जयश्री लोहाडे, कोषाध्यक्ष श्वेता गंगवाल यांच्या सह कार्यक्रम ाचे प्रोजेक्ट चेअरमन उज्वला पाटणी, किर्ती पाटणी, सिम्मी पाहाडीया, दिपाली पांडे, मिताली काला, सपना पाटणी, यांच्या सह संस्थापीका अध्यक्षा अनुपमा दगडा, दिपीका बडजाते, रिचा कासलीवाल, श्वेता सेठी, मोनीका चांदीवाल, डॉ. याशीका पांडे, छाया कासलीवाल, रचना पाहाडे, नेत्रजा कसलीवाल, रानु सेठी, सिमा बडजाते, सारिका बडजाते, रिना ठेळे, पुजा झाजरी, स्वाती कासलीवाल, यांच्या सह सकल जैन समाजाच्या बांधवाणी केली आहे.

अशी माहिती नरेद्र अजमेरा, पियुष कासलीवाल यांनी दिली आहे.

कार्यक्रमासाठी भगवान महावीर जन्म कल्याण महोत्सवा समितीचे पदाधीकारी व सकल जैन समाजाचे बांधव उपस्थित रहाणार आहेत

# राज्यस्तरीय 'मिलिंद मॅरेथॉन २०२५' चे भव्य आयोजन -मॅरेथॉनमध्ये धावणार हजारो विद्यार्थी व नागरिक

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

बोधीसत्व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेल्या पीपल्सब एज्युकेशन सोसायटी मुंबईच्या छत्रपती संभाजीनगर येथील मिलिंद म हाविद्यालयाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करण्यासाठी रविवारी दि. १३/०४/२०२५ रोजी होणाऱ्या 'मिलिंद मॅरेथॉन २०२५' ची तयारी पूर्ण झाली असुन हजारो नागरिक शहरातील रस्त्यावरुन मॅरेथॉनमध्ये सहभागी होऊन धावणार आहेत.

मिलिंद मॅरेथॉन २०२५ 'रन फॉर मिलिंद' हे ब्रिद वाक्य घेऊन या मिलिंद मॅरेथॉनमध्ये मुख्यत्वे ७ कि.मी. रनसाठी पुरुष व महिलासाठी पहिले पारितोषिक रु. १०,०००/- व ट्रॉफी तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या फोटोचा २४ कॅरेट गोल्ड प्लेटेड टि-शर्ट, द्वितीय पारितोषिक रु. ८,०००/- व ट्रॉफी तर तृतीय पारितोषिक रु. ६,०००/- व ट्रॉफी ठेवण्यात आले आहे. ५ कि.मी. रनसाठी पुरुष व महिला पहिले पारितोषिक रु. ८,०००/- व ट्रॉफी, द्वितीय पारितोषिक रु. ६,०००/- व ट्रॉफी तर तृतीय पारितोषिक रु. ४,०००/- व ट्रॉफी ठेवण्यात आले आहे, तर ३ कि.मी. रनसाठी पुरुष व महिला पहिले पारितोषिक रु.६,०००/- व ट्रॉफी, द्वितीय पारितोषिक रु.४,०००/- व ट्रॉफी तर तृतीय पारितोषिक रु.२,०००/- व ट्रॉफी ठेवण्यात आले आहे, तर जेष्ठ नागरिकांसाठी रन फॉर फन चे ही आयोजन करण्यात आले आहे. मिलिंद मॅरेथॉनमध्ये सहभागी होणाऱ्या सर्व स्पर्धकांनी सकाळी ठिक ५.०० वाजता मिलिंद महाविद्यालयाच्या प्रांगणात आपल्या टि-शर्ट व बीब नंबर परीधान करुन उपस्थिती नोंदविणे आवश्यक आहे.

**मिलिंद महाविद्यालय अमृत महोत्सवी वर्ष**

## ...आमच्यासाठी स्वाभीमानाची गोष्ट

इंडियन आर्मीचा लोगो वापरण्याची मंजुरी ही आम्हाला मिळाली आहे. काही सदस्य देखील आमच्या या उपक्रमात सहभागी देखील होणार जी आमच्यासाठी स्वाभीमानाची गोष्ट आहे. मिलिंद मॅरेथॉनच्या यशस्वी



आयोजनासाठी शहरातील विविध सेवाभावी संस्थांनी प्रायोजक म्हणून सहभागी होण्यासाठी संमती दिलेली असून मॅरेथॉन मधील बक्षिसांची रक्कम मा. सचिव, मा. प्राचार्य एस.टी.प्रधान फाऊंडेशन, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडून देण्याचे मान्य केले आहे. करीता मोठ्या संख्येने विद्यार्थी, युवक, खेळाडू व विविध क्षेत्रातील नागरिकांनी उपस्थित राहुन मिलिंद मॅरेथॉनमध्ये सहभागी व्हावे. असे आवाहन मिलिंद मॅरेथॉनच्या मुख्य संयोजक व प्राचार्या डॉ. वैशाली प्रधान यांनी केले आहे.



- **पहिली स्पर्धा सकाळी ६.०० वाजता ७ कि.मी. साठी सुरु होईल,**
- **दुसरी स्पर्धा सकाळी ६.१५ वाजता ५ कि.मी. साठी सुरु होईल.**
- **तिसरी स्पर्धा सकाळी ६.३० वाजता ३ कि.मी. साठी सुरु होईल तसेच यामध्ये रन फॉर फन सकाळी ७.०० वाजता सुरु होईल.**

# गुरू परिवार द्वारा भगवान महावीर जन्म कल्याणक औचित्य साधुन सुवर्ण भविष्याकडे करिअर आणि उद्योजगता मार्गदर्शन सोमिनारचे मोफत आयोजन

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

गुरू परिवार द्वारा भगवान महावीर जन्म कल्याणक औचित्य साधुन सुवर्ण भविष्याकडे करिअर आणि उद्योजगता मार्गदर्शन सोमिनारचे मोफत आयोजन छत्रपती संभाजीनगर प्रतिधिनी गुरू परिवार व भगवान महावीर जन्म कल्याण महोत्सव समिती सकल जैन समाज यांच्या सयुक्त विद्यमाने प.पु. राष्ट्र संत तरूणसागरजी महाराज स्थापित गुरू परिवारच्या वतिने नेहमी सामाजीक व जन कल्याणकारी उपक्रम राबविले जातात याच अंतर्गत दिनांक ०४ एप्रिल रोज संध्याकाळी ७.३० वा. चंद्रसागर धर्म शाळा शाहगंज येथे ८ वी ते १२ वी च्या विद्यार्थ्यासाठी करिअर बद्दल सेमिनारचे आयोजन करण्यात आले आहे. यासाठी सावण चुडिवाल यांच्या वतिने करिअर कॉन्सलिक सेमिनार होणार आहे. तसेच अंकिता संचेती यांचे सुध्दा मार्गदर्शन मिळणार आहे. तसेच कामिनी सेठी बाल मानो वैद्यानिक व पॅरेटीक केच यांचे सुध्दा मार्गदर्शन मिळणार आहे.

कार्यक्रमाचे संयोजक विजय चांदीवाल, पवन पाटनी, प्रसाद दगड़ा, प्रितम पाटणी, प्रशांत काला आहे. व तरी सर्व स्थरातील बांधवानी या कार्यक्रमाचे लाभ घ्यावा. असे आवाहन गुरू परिवार व जनकल्याण महोत्सव समिती तर्फे करण्यात आले आहे.

# न्यू इंडिया बँक घोटाळाप्रकरणी मोठी अपडेट; आरोपींच्या तब्बल १६७ कोटींच्या मालमत्तांवर टाच

मुंबई : न्यू इंडिया को-ऑप. बँकेतील १२२ कोटी रुपयांच्या गैरव्यवहार प्रकरणात आरोपींच्या २१ मालम त्तांवर टाच आणण्याची परवानगी न्यायालयाने दिली आहे. या मालमत्ता सुमारे १६७ कोटी रुपयांच्या आहेत. महादंडाधिकाऱ्यांनी आर्थिक गुन्हे शाखेला परवानगी दिल्याने बँकेतील ठेवीदारांसाठी हा मोठा दिलासा मानला जात आहे. त्याचप्रमाणे बँकेने बुडीत कर्ज वसुलीचे काम दिलेल्या कंपनीचीही चौकशी आर्थिक गुन्हे शाखेचे अधिकारी करणार आहेत.

न्यू इंडिया बँकेचा महाव्यवस्थापक आणि अकाऊंट्स विभागाचा प्रमुख हितेश मेहता याने पदाचा गैरवापर करत अन्य साथीदारांच्या मदतीने बँकेच्या प्रभादेवी आणि गोरेगाव कार्यालयातील तिजोरीत ठेवलेल्या १२२ कोटींचा अपहार केला. बँकेतील या आर्थिक अनियमिततेबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी देवर्शी घोष यांनी दिलेल्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला. आर्थिक गुन्हे शाखेच्या पथकाने या प्रकरणात मेहता, धर्मेश पौन, माजी सीईओ अभिमन्यू भोवन, मनोहर अरुणाचलम, कपिल देढिया आणि उल्हनाथन अरुणाचलम या आरोपींना अटक केली. या प्रकरणातील दोन आरोपी विदेशात असल्याचे पोलिसांनी म्हटले असून त्यांच्याविरुद्ध लुकआऊट नोटीस जारी केली आहे.

तपास सुरू असतानाच आर्थिक गुन्हे शाखेने भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम १०७च्या तरतुदींनुसार या प्रकरणात आरोपींच्या मालमत्तांवर टाच आणण्यासाठी न्यायालयाकडे अर्ज दाखल केला. महादंडाधिकारी न्यायालयाने २१ मालमत्तांवर टाच आणण्यास परवानगी दिली असून, मुंबईतील हा पहिलाच प्रकार आहे.

# पोलीस आयुक्त प्रवीण पवार साहेबांची महाराष्ट्र प्रदेश अल्पसंख्यांक कॉंग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष इब्राहिम पठाण यांनी भेट घेतली



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

शहराचे पोलीस आयुक्त प्रवीण पवार साहेबांची महाराष्ट्र प्रदेश अल्पसंख्यांक कॉंग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष इब्राहिम पठाण यांनी सदिच्छा भेट घेतली. रमजान महिन्यांमध्ये पोलिसांनी कायदा व्यवस्था सुरळीत ठेवली म्हणून पोलीस आयुक्त साहेब यांचे धन्यवाद व्यक्त करण्यात आले. यावेळी महाराष्ट्र प्रदेश अल्पसंख्यांक कॉंग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष इब्राहिम पठाण साहेब, अल्पसंख्यांक शहर जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष मोईन इनामदार, शहर जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे शहर जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे सरचिटणीस अनिस पटेल महाराष्ट्र प्रदेश युवक कॉंग्रेस चे महासचिव इरफान इब्राहिम पठाण उपस्थित होते.

# बॉक्स ऑफिसवर 'छावा'चीच डरकाळी

मुंबई - विकी कौशलचा 'छावा' हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर ५० दिवस पूर्ण करणार आहे. फार कमी चित्रपटांमध्ये असं घडतं की, ते इतके दिवस पडद्यावर राहू शकतात. चला तर मग जाणून घेऊया सिनेमाच्या कमाईबद्दल. विकी कौशलचा चित्रपट अलिकडेच प्रदर्शित झालेल्या साऊथच्या एल२ एम्पुरन आणि सलमान खानच्या सिकंदर या चित्रपटांविरुद्ध उभं राहणं ही एक उत्तम गोष्ट आहे.

# समता पंधरवाडा:जात पडताळणीसाठी अर्ज करण्याचे आवाहन

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

सामाजिक न्याय विभागाच्या वतीने दि.१ ते १४ एप्रिल या कालावधीत समता पंधरवाडा राबविण्यात येत आहे. या कालावधीत जात पडताळणी प्रमाणपत्रासाठी सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात इयत्ता ११ वी , १२ वि विज्ञान शाखेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पद्धतीने अर्ज करावे,असे आवाहन संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती किशोर कुलकर्णी यांनी केले आहे.

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये इयत्ता ११ वी व १२ वी विज्ञान शाखेत प्रवेश घेतलेल्या व इयत्ता १२ वी नंतर अभियांत्रिकी, वैद्यकीय, कृषी, पशुसंवर्धन, विधी इ. व्यावसायिक अभ्यासक्रम प्रवेश व इतर लाभ घेऊ इच्छिणाऱ्या अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग, विशेष मागासवर्ग व सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्ग या विविध प्रवर्गाच्या ज्या विद्यार्थ्यांनी अद्यापपर्यंत जात प्रमाणपत्र पडताळणीसाठीचे अर्ज समिती कार्यालयात सादर केले नाहीत, अशा विद्यार्थ्यांसाठी महामानव भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून, दि.१ एप्रिल ते १४ एप्रिल या कालावधीत 'समता पंधरवाडा' निमित्ताने जिल्हा जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती यांच्या वतीने दरवर्षी प्रमाणे विशेष मोहिम राबविण्यात येत आहे. विद्यार्थ्यांनी त्यांचे जात प्रमाणपत्र पडताळणीचे अर्ज ह्ीींिं:// लरींींळर्शीरश्रळवळीूं.ारहरीरिहींीर.सीें.ळप या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने सादर करावेत व ऑनलाईन अर्जाची हार्डकॉपी आवश्यक त्या कागदपत्राच्या साक्षांकित प्रती जोडून जिल्हा जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, छत्रपती संभाजीनगर या समिती कार्यालयात त्वरीत सादर करावेत.

विद्यार्थ्यांचे अर्ज प्राप्त झाल्यानंतर अर्जावर समितीकडून तात्काळ कार्यवाही करुन संबंधित विद्यार्थ्यांना ऑनलाईन पद्धतीनेच जात वैधता प्रमाणपत्र निर्गमित करण्यात येतील, असे आवाहन संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव जिल्हा जाती प्रमाणपत्र पडताळणी समि ती किशोर कुलकर्णी यांच्या मार्फत करण्यात येत आहे.

# भगवान महावीर जन्म कल्याण महोत्सव महिला समिती अंतर्गत साधना भवन महिला मंडळाच्या धार्मिक- सामान्यज्ञान प्रश्न मंच स्पर्धेला महिलांचा प्रतिसाद

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

भगवान महावीर जन्म कल्याण महोत्सव महिला समिती अंतर्गत श्री महावीर स्थानक वासी जैन श्रावक संघ साधना भवन हडको महिला मंडळातर्फे धार्मिक व सामान्य ज्ञान प्रश्न मंच स्पर्धा मंगळवारी झाली. यास महिलांचा अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला.

चंद्रप्रभू खंडेलवाल जैन मंदिर हडको येथे झालेल्या स्पर्धेत १२० स्पर्धक महिलांनी भाग घेतला अध्यक्ष विजय देसर्डे यांच्या मार्गदर्शनाखाली राखी बोरा शितल कटारिया सीमा पारक शिल्पा संचेती रश्मी बोथरा योगिता चोरडिया यांनी अभ्यासू धार्मिक व सामान्य ज्ञानावर आधारित प्रश्न विचारले होते.



स्पर्धेचे उद्घाटन ज्येष्ठ पत्रकार स.सो. खंडाळकर स्वप्निल पारख भारती बागरेच्या कैलास कासलीवाल, निलेश जैन बाहुबली बायकोस, मुकेश गंगवाल मुकेश साहूजी प्रतीक साहूजी, प्रमोद पाटणी, राहुल कासलीवाल, मनीषा भन्साळी सविता लोढा भावना सेठिया, करुणा साहूजी, अशोक अजमेरा डॉक्टर शैलेश चांदीवाल मंगल पारख, संगीता संचेती, सारिका साहूजी, तनुजा गांधी, कला आचलिया प्रमोद पाटणी, मीना पापडीवाल मंजू पाटणी आशा कासलीवाल, आदींच्या उपस्थितीत अशी माहिती प्रशांत शहा नरेद्र अजमेरा यांनी दिली

हे वृत्तपत्र मालक, मुद्रक , प्रकाशक - श्री. **रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४ ५ ए , सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर , सिडको, औरंगाबाद (महा.) - ४ ३ १ ० ० ५ येथे छापून शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७, सिडको पोलीस स्टेशन जवळ, औरंगाबाद (महा.)- ४ ३ १ ० ० ३ येथे प्रसिध्द केले.

• **संपादक : रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** • मो. **7588166496** • Email : **attalsanket2023@gmail.com** • **RNI No. MAHMAR/2023/87816**

This Daily Printed, Published and Owned by **RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** Printed at Mansi Printers, Plot No. 45 A, Service Industry Sector, Aurangabad (M.S.)- 431005 and Published at Shop No. 3, Keshardeep Complex, N-7, Near Cidco Police Station, Aurangabad (M.S.)- 431003

• **Editor : RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** • मो. **7588166496** • Email : **attalsanket2023@gmail.com** • **RNI No. MAHMAR/2023/87816**